महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६
दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-३(अ)/ई-मेल/२०२४/ 864

दिनांक- 21 FEB 2024

# परिपत्रक –

**विषय- शासकीय कामकाजामध्ये एनआयसीच्या ई-मेलचा वापर करणेबाबत...**

संदर्भ- सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रं.GAD-32036/11/2024-GAD (DESK 18) दिनांक ०७/०२/२०२४.

सर्व संस्था प्रमुख/कार्यालयाप्रमुख यांना वरील परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, संदर्भिय परीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यानुसार सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांनी शासकीय कामकाजाकरिता मेल करताना खाजगी अथवा अन्य कोणत्याही ई-मेलचा वापर न करता, एनआयसीच्या ई-मेलचा वापर करावा. तसेच प्राप्त होणारे शासकीय ईमेल whatsapp, Messaging अथवा तत्सम Platform एनआयसीच्या वर डाऊनलोड करण्यात येणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्याअनुषंगाने एखादा कर्मचारी शासकीय ईमेल whatsapp, Messaging अथवा तत्सम Platform एनआयसीच्या वर डाऊनलोड करतांना निदर्शनास आल्यास, तो शिस्तभंगविषयक कार्यवाहीस पात्र राहील.

सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून त्यांची स्वाक्षरी घ्यावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी.

शासकीय कामकाजामध्ये एनआयसीच्या ई-मेलचा वापर करणेबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : GAD-३२०३६/११/२०२४-GAD(DESK-१८)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०७ फेब्रुवारी, २०२४

**संदर्भ :** केंद्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाची ई-मेल पॉलिसी, ऑक्टोबर, २०१४ (Version १.०)

**शासन परिपत्रक**

केंद्र शासनाच्या "ई-मेल पॉलिसी" नुसार केंद्र शासनांतर्गत एनआयसी यांनी उपलब्ध करून दिलेल्या शासकीय ई-मेल सेवेचा वापर राज्य शासनाच्या कामकाजात करणे बंधनकारक आहे. त्यानुसार सर्व शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना शासनाच्या दैनंदिन कामकाजाकरिता एनआयसीचे ई-मेल आयडी यापूर्वीच उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. तथापि, अद्यापही मंत्रालयात तसेच काही क्षेत्रीय कार्यालयांकडून एनआयसीच्या ई-मेलचा १००% वापर होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे.

२. सबब, भविष्यात सायबर अटॅक किंवा हॅकिंग यामुळे शासनाच्या संवेदनशील/गोपनीय माहितीचा दुरूपयोग होऊ शकतो. सदर बाब लक्षात घेता, सर्व क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना असे निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी शासकीय कामकाजाकरिता मेल करताना खाजगी अथवा अन्य कोणत्याही ई-मेलचा वापर न करता, एनआयसीच्या ई-मेलचा वापर करावा. तसेच प्राप्त होणारे शासकीय ईमेल Whatsapp, Messaging अथवा तत्सम Platform वर डाऊनलोड करण्यात येणार नाही, याची दक्षता देखील सर्व संबंधितांनी घ्यावी. या उपरही असे करताना एखादा कर्मचारी निदर्शनास आल्यास, तो शिस्तभंगविषयक कार्यवाहीस पात्र राहील. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधीनस्त कार्यालयांना उक्त सूचनांचे पालन करण्याबाबत कळवावे.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२४०२०७१६१३३८८२०७ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

पुणे.
- 8 FEB 2024
आवक क्र. 142664

ROSHANI DINESH KADAM PATIL

Digitally signed by ROSHANI DINESH KADAM PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT,
2.5.4.20=685cbbb5899027ea29d44ae02d12f2c1313143ad8376755d0e815a1eb20fd0ce, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=16D26A3CE7C66CC341C246E6BB468A60B20659CCB13144AF609F03226E90BA0C, cn=ROSHANI DINESH KADAM PATIL
Date: 2024.02.07 16:21:04 +05'30'

(रो.दि.कदम-पाटील)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य.
३. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
४. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. मा.उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ३२.
७. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ३२.
८. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
९. निवडनस्ती